# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

**MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE DIVISIONAL BOARD. PUNE - 411005**

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | FAX - 020 / 25536761 |
| --- | --- | --- |
| 25536722 | 25536781 / 82 / 83 | E- MAIL sscboardpune@gmail.com |
| (OFF) | 25536712 (OFF) | Website : www.sscboardpune.in |


क्रमांक:पुविमं/शाखा ओ-२/उ.मा./1234
पुणे ४११००५
दिनांक : २२ सप्टेंबर, २०१६.

प्रति,

प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे / अहमदनगर / सोलापूर.

**विषय :-** खाजगी विद्यार्थी अर्ज योजने अंतर्गत इ. १० वी जुलै २०१५ परीक्षेला उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना फेब्रु./मार्च २०१७ मध्ये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी (फॉर्म नं. १७) भरून नावनोंदणी करून परीक्षेस प्रविष्ठ होणेबाबत...

**संदर्भ :-** राज्य मंडळ पत्र क्र. रा.मं./परीक्षा-३/७०६८ दि. ९/९/२०१६. .

उपरोक्त विषयास व संदर्भाधीन राज्य मंडळाचे पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांना इ. १० वी उत्तीर्ण झाल्यानंतर दोन वर्षाचे खंडानंतर इ. १२ वी परीक्षेस प्रविष्ठ होता येते.

शासन आदेशानुसार ऑक्टोबर मधील परीक्षा जुलै मध्ये घेण्याचा निर्णय झालेला असल्याने जुलै परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास दोन वर्षाचा खंड नसल्याने मार्च परीक्षेस प्रविष्ठ होता येत नाही.

विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून इ. १० वी ची परीक्षा जुलै मध्ये उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यास त्यापुढील शैक्षणिक वर्षात नाव नोंदणी करून फेब्रुवारी-मार्च इ. १२ वी परीक्षस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होता येईल.

सदर बाब आपल्या स्तरावरून संबंधीत विद्यार्थी व पालकांचे निदर्शनास आणून देण्यात यावी. याबाबतचे संदर्भीय पत्र सोबत जोडण्यात आले आहे.

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११००५.

प्रत माहितीस्तव :-

१. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
२. शिक्षणाधिकारी (माध्य.), पुणे/अहमदनगर/सोलापूर.